# RInfra–Distribution (RInfra-D)

## Executive Summary (Marathi):

Multi Year Tariff (MYT) Petition for the Control Period:- FY 2012-13 to FY 2015-16

Filed with

Maharashtra Electricity Regulatory Commission

## अनुक्रमणिका


1.1. परिचय ....................2

1.2. आरइन्फ्रा–डीवर एक दृष्टिक्षेप ....................2

1.3. एकत्रित महसुलाची आवश्यकता....................2

1.3.1. विक्री....................2

1.3.2. वितरणातील तोटा आणि शिल्लक ऊर्जा....................3

1.3.3. ऊर्जा प्राप्ती योजना....................4

1.3.4. भांडवली खर्च आणि भांडवलीकरण....................8

1.3.5. घसारा....................9

1.3.6. दीर्घकालीन भांडवली कर्जावरील व्याज....................10

1.3.7. प्रचालन आणि देखभाल खर्च....................11

1.3.8. समभागावरील परतावा....................11

1.3.9. खेळत्या भांडवलावरील व्याज....................12

1.3.10. आकस्मिकता राखीव निधीसाठी वर्गणी....................12

1.3.11. आयकर....................12

1.3.12. दरपत्रकाव्यतिरिक्तचे उत्पन्न....................12

1.3.13. इतर व्यवसायापासूनचे उत्पन्न....................13

1.3.14. किरकोळ पुरवठा ग्राहकांकडून सुरक्षा अनामतीवरील व्याज....................13

1.3.15. टीपीसी–जीशी संबंधित मागील काळात कमी झालेली वसुली....................13

1.3.16. वार्षिक महसुलाची आवश्यकता....................13

1.4. मागील काळातील महसुलाची वसुली....................16

1.5. व्हिलिंग आकार....................17

1.6. क्रॉस सबसिडी अधिभार....................17

1.7. आव 12–13 साठी महसुलातील तफावत....................20

1.8. सध्याच्या दरपत्रकापासूनची महसुलातील तफावत/अधिक्य....................20

1.9. दरपत्रक प्रस्ताव....................20

1.9.1. दरपत्रकाची तत्त्वे....................20

1.9.2. प्रस्तावित दर ....................20

1.9.3 प्रस्तावित दरपत्रकांपासूनचा महसूल....................24

### 1.1. परिचय

माननीय महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने (यानंतर ज्याचा उल्लेख माननीय आयोग/एमईआरसी असा केलेला आहे) महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (बहुवर्षीय दरपत्रक) नियमावली 2011 (जिचा उल्लेख यानंतर एमवायटी नियमावली असा केलेला आहे) दिनांक 4 फेब्रुवारी 2011 रोजी जारी केलेली आहे. ही नियमावली, माननीय आयोगाने 2011 च्या प्रकरण क्र. 45 मध्ये दिलेल्या आदेशान्वये आरइन्फ्रा–डीसाठी आव 12–13 पासून पुढे लागू करण्यात आलेली आहे.

एमईआरसी एमवायटी नियमावली 2011 मध्ये सदर नियमावली अंतर्गत माननीय आयोगाने दरपत्रक निश्चित करताना अंगीकारावयाची तत्त्वे नमूद केलेली आहेत. सदर एमवायटी नियमावलीनुसार परवानाधारकांनी आव 11–12 ते आव 15–16 या दुसऱ्या नियंत्रण कालावधीसाठी त्यांच्या बहुवर्षीय व्यवसाय योजना सादर करण्याची आवश्यकता असते. रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड – वितरण व्यवसाय (यानंतर जिचा उल्लेख आरइन्फ्रा–डी असा केलेला आहे) यांनी 2011 च्या प्रकरण क्र. 158 अंतर्गत सादर केलेली आहे.

माननीय आयोगाने या आधीच 2011 च्या प्रकरण क्र. 158 मध्ये दिनांक 23 नोव्हेंबर 2012 रोजी आदेश दिलेला आहे.

एमवायटी नियमावलीच्या नियम 8 मध्ये, वार्षिक महसुलाच्या आवश्यकतेचा अंदाज आणि व्यवसाय योजनेवरील दरपत्रकाच्या आधारे मिळणे अपेक्षित असलेला महसूल यांची तरतूद केलेली आहे. एमईआरसीने 2011 च्या प्रकरण क्र. 158 मध्ये दिलेल्या आपल्या आदेशात आरइन्फ्रा–डीला एमवायटी याचिका सादर करण्याचे निर्देश दिलेले आहेत. वरील आधारे आरइन्फ्रा–डी ही सध्याची एमवायटी याचिका सादर करीत आहे.

### 1.2. आरइन्फ्रा–डीवर एक दृष्टिक्षेप

रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड (यानंतर जिचा उल्लेख आरइन्फ्रा असा केला गेलेला आहे) एक एकात्मिक सार्वजनिक सेवा पुरविणारी संस्था असून ती मुंबईच्या उपनगरांमध्ये व सभोवतालच्या परिसरात विजेची निर्मिती, पारेषण आणि वितरण हे कार्य करते. माननीय आयोगाने विद्युत अधिनियम 2003 च्या कलम 15 अंतर्गत आरइन्फ्रा–डीला वितरण परवाना दिलेला आहे.

आरइन्फ्रा–डीची वितरण प्रणाली सध्या आपल्या परवानाप्राप्त भागामध्ये (वितरण परवान्यामध्ये दिल्यानुसार मुंबईच्या उपनगरांमध्ये व सभोवतालच्या परिसरामध्ये) सुमारे 2.8 दशलक्ष ग्राहकांच्या विजेच्या गरजा पूर्ण करीत आहे व त्यासाठी 9 अब्ज युनिटस् एवढ्या विजेचे वार्षिक निवेशन (इनपूट) करावे लागते व प्रासंगिक कमाल मागणी सुमारे 1650 एमव्हीए एवढी असते. 31 मार्च 2012 रोजीनुसार आरइन्फ्रा–डीच्या वितरण प्रणालीमध्ये 11 केव्हीची 5775 उपकेंद्रे, 4519 किमी लांबीची एचटी केबल आणि 4202 किमी लांबीची एलटी केबल, इत्यादींचा समावेश होता.

### 1.3. एकत्रित महसुलाची आवश्यकता

#### 1.3.1. विक्री

ग्राहकांनी आरइन्फ्रा–डीकडून टीपीसी–डीकडे स्थलांतर केल्याने, आरइन्फ्रा–डीच्या मागील आकडेवारीमध्ये बदलून गेलेल्या (चेंजओव्हर) ग्राहकांचा समावेश आहे. 2011 च्या प्रकरण 151 मध्ये दिलेल्या आदेशाच्या परिणामामुळे, ग्राहकांचे बदलून जाणे (चेंजओव्हर) सध्या फक्त निवासी 0–300 या संवर्गापुरते मर्यादित आहे. म्हणून, चेंजओव्हर विक्रीचा आरइन्फ्रा–डीच्या स्वत:च्या विक्रीवर झालेल्या परिणामाचा कल मागील कलाशी केलेल्या तुलनेत वेगळा असेल.

स्थलांतराचा अचूक परिणाम विचारात घेण्यासाठी व त्यायोगे आरइन्फ्रा–डीच्या स्वत:च्या चेंजओव्हर विक्रीवर होणारा परिणाम विचारात घेण्यासाठी, दुसऱ्या नियंत्रण कालावधीमध्ये आरइन्फ्रा–डीच्या स्वत:च्या विक्रीचा अंदाज लावण्यासाठी खालील दृष्टिकोन अवलंबिलेला आहे:

- टप्पा 1: ग्राहकांच्या प्रत्यक संवर्गासाठी टीपीसी–डीच्या क्षेत्रासह सामायिक क्षेत्रातील आरइन्फ्रा–डीच्या एकूण विक्रीचा अंदाज (स्थलांतरित/चेंजओव्हर ग्राहकांना बहाल करण्यायोग्य विक्रीसह).

- टप्पा 2: माननीय आयोगाने 2011 च्या प्रकरण 151 मध्ये दिलेल्या आदेशाचा परिणाम विचारात घेऊन ग्राहक संवर्ग निहाय चेंजओव्हर विक्रीचा अंदाज

- टप्पा 3: वरील टप्पा 1 व टप्पा 2 पेक्षा वेगळा असलेल्या आरइन्फ्रा–डीच्या स्वत:च्या विक्रीचा अंदाज

मागील वृद्धीचा कल विचारात घेऊन एकूण विक्रीचा अंदाज व्यक्त केलेला आहे. विक्रीचा अंदाज व्यक्त करण्यासाठी संबंधित ग्राहक संवर्गाला केलेल्या विक्रीचा पाच वर्षांचा सीएजीआर उपयोगात आणलेला आहे. चेंजओव्हर विक्रीचा अंदाज 1) सध्याच्या चेंजओव्हर ग्राहकांना केलेली विक्री 2) ग्राहकांच्या अतिरिक्त चेंजओव्हरमुळे झालेली विक्री 3) 22 ऑगस्ट 2012 रोजीनुसार प्रलंबित असलेल्या चेंजओव्हरच्या अर्जांच्या बाबतीतली विक्री 4) 2011 च्या प्रकरण 151 चा परिणाम, ज्यायोगे असे गृहीत धरण्यात आलेले आहे की, टीपीसी–डी निश्चित करण्यात आलेल्या 11 समूहांमधील/प्रभागांमधील चेंजओव्हर ग्राहकांना स्वत:च्या नेटवर्कमधून सेवा देईल.

त्यानंतर आरइन्फ्रा–डीची स्वत:ची विक्री, एकूण विक्री आणि चेंजओव्हर विक्री यामधील फरक लक्षात घेऊन निश्चित केली जाते. मुंबई मेट्रो एक प्रकल्पातील रेल्वे संवर्गापासूनची अतिरिक्त विक्री आणि आरइन्फ्रा–टीच्या उभारण्यात येत असलेल्या ईएचव्ही उपकेंद्रांच्या विक्रीचा समावेश आरइन्फ्रा–डीच्या स्वत:च्या विक्रीमध्ये करण्यात आलेला आहे.

डीएसएमसंबंधी पावले उचलून प्रणालीची मागणी व ऊर्जेचा खप कमी करण्याचे आरइन्फ्रा–डीचे प्रयत्न चालूच आहेत. एमवायटी कालावधीमध्ये, आधीच चालू असलेल्या योजना चालू ठेवून त्या पूर्ण करण्याचा व त्यासोबत माननीय आयोगाने आधीच मंजूर केलेल्या नवीन योजना सुरू करण्याचा आरइन्फ्रा–डीचा विचार आहे. आरइन्फ्रा–डीच्या स्वत:च्या विक्रीचा अंदाज वर्तविताना अशा डीएसएम उपाययोजनांचा परिणाम विचारात घेतलेला आहे.

आरइन्फ्रा–डीच्या स्वत:च्या विक्रीचा आणि चेंजओव्हर विक्रीचा सारांश खाली दिलेला आहे

**तक्ता 1: आरइन्फ्रा–डीच्या स्वत:च्या विक्रीचा आणि चेंजओव्हर विक्रीचा सारांश**

| तपशील | आव 12–13 | आव 13–14 | आव 14–15 | आव 15–16 |
|---|---|---|---|---|
| आरइन्फ्रा–डीची स्वत:ची विक्री | 6346.36 | 6593.68 | 6790.34 | 7020.09 |
| चेंजओव्हर विक्री | 3076.30 | 1566.50 | 526.07 | 548.76 |
| **एकूण विक्री** | **9422.66** | **8160.17** | **7316.40** | **7568.84** |

### 1.3.2. वितरणातील तोटा आणि शिल्लक ऊर्जा

व्यवसाय योजनेमध्ये आव 11–12 साठी तोट्याची विचारात घेतलेली पातळी 9.05% एवढी होती, जी एक तात्पुरती संख्या होती व ती आव 10–11 च्या वास्तविक आकडेवारीवर आधारित होती. तथापि, आव 10–11 च्या आणि आव 11–12 च्या ट्रू अप याचिकेत उल्लेख केलेल्या कारणांमुळे (2012 चे प्रकरण क्र. 124), आव 11–12 साठीचा वास्तविक तोटा 9.46% एवढा आहे. याचाच वापर एमवायटी कालावधी – आव 12–13 ते 15–16 साठी आधार पातळी म्हणून करण्यात आलेला आहे.

दुसऱ्या एमवायटी नियंत्रण कालावधीसाठी वार्षिक महसुलाची आवश्यकता आणि दर यांचा अंदाज लावण्यासाठी 9.46% या आधार तोट्यामध्ये आव 13–14 पर्यंत कोणतीही घट अपेक्षित धरलेली नाही. असे गृहीत धरण्यात आलेले आहे की, शेवटच्या दोन वर्षांमध्ये तोटा 0.05%ने कमी होऊन तो आव 15–16 मध्ये 9.36% एवढा होईल.

म्हणून, आरइन्फ्रा–डी या एमवायटी याचिकेत दुसऱ्या नियंत्रण कालावधीसाठी वितरणातील तोटा पुढीलप्रमाणे प्रस्तावित करीत आहे.

**तक्ता 2: वितरणातील तोट्याचा विक्षेपमार्ग (%)**

| तोट्याची पातळी | आव 12-13 | आव 13-14 | आव 14-15 | आव 15-16 |
|---|---|---|---|---|
| वितरणातील तोटा | 9.46% | 9.46% | 9.41% | 9.36% |

आरइन्फ्रा-डीने वरील वितरणातील तोट्याच्या विक्षेपमार्गाचा अंदाज आणि 4.85% पारेषणातील तोटा, आव 12-13 ते आव 15-16 साठी वीज खरेदीची आवश्यकता अंदाजित करण्यासाठी विचारात घेतलेला आहे.

**तक्ता 3: वीज खरेदी आवश्यकतेचा सारांश**

| तपशील | आव 12-13 | आव 13-14 | आव 14-15 | आव 15-16 |
|---|---|---|---|---|
| एकूण विक्री (चेंजओव्हर विक्रीसह) (मेयू) | 9422.66 | 8160.17 | 7316.40 | 7568.84 |
| वितरणातील तोटा (%) | 9.46% | 9.46% | 9.41% | 9.36% |
| वितरण प्रणालीतील ऊर्जा निवेशन (मेयू) | 10,407.18 | 9,012.78 | 8,076.39 | 8,350.45 |
| चेंजओव्हर ग्राहकांना बहाल करण्याजोगे निवेशन (मेयू) | 3,312.65 | 1,684.97 | 562.21 | 586.83 |
| आंतरराज्यीय पारेषण प्रणाली तोटा (%) | 4.85% | 4.85% | 4.85% | 4.85% |
| **आरइन्फ्रा-डीची वीज खरेदीची आवश्यकता (मेयू)** | **7,456.15** | **7,701.33** | **7,897.19** | **8,159.34** |

**1.3.3. ऊर्जा प्राप्ती योजना**

आरइन्फ्रा-डीने मेवॅच्या हिशेबात आधार भार आणि सर्वोच्च भार यांचे पूर्वानुमान आपल्या निर्मिती आणि पारेषण सीमेवरील विक्रीच्या पूर्वानुमानाच्या आणि वीज खरेदी आवश्यकतेच्या पूर्वानुमानाच्या आधारे केलेले आहे.

आरइन्फ्रा-डीने अधिक्य आणि तुटवडा यांचे विश्लेषण, दुसऱ्या नियंत्रण कालावधीची आवश्यकता पूर्ण करण्यासाठी, विविध पातळ्यांच्या निर्मिती क्षमतेवर आधारित केलेले आहे. असे दिसून आले होते की, सरासरी मागणीएवढीच विचारात घेतलेली आधारभूत मागणी ही सर्वोत्तम होती. म्हणून, आरइन्फ्रा-डीने आधारभूत भार हा दुसऱ्या कालावधी नियंत्रण कालावधीसाठी सरासरी मागणी म्हणून विचारात घेतलेला आहे. खालील तक्त्यात आरइन्फ्रा-डीच्या दुसऱ्या नियंत्रण कालावधीसाठीच्या अनुमानांसाठी आधारभूत मागणी आणि सर्वोच्च मागणी दिलेली आहे.

**तक्ता 4: सर्वोच्च आणि आधारभूत मागणीचा सारांश**

| तपशील | आव 12-13 | आव 13-14 | आव 14-15 | आव 15-16 |
|---|---|---|---|---|
| वीज खरेदीची आवश्यकता (मेयू) | 7456.15 | 7701.33 | 7897.19 | 8159.34 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| सर्वोच्च मागणी (मेवॅ) | 1251.70 | 1292.86 | 1325.74 | 1369.75 |
| सरासरी मागणी (मेवॅ) | 851.16 | 879.15 | 901.51 | 931.43 |

वर दिलेल्या विश्लेषणातून दर्शविलेली आधारभूत भाराची पूर्तता करण्यासाठीची ऊर्जा प्राप्ती, दीर्घ मुदतीच्या कराराच्या आणि मध्यम मुदतीच्या कराराच्या मिश्रणातून केली जाईल. आरइन्फ्रा–जीचे डहाणू औष्णिक वीजनिर्मिती केंद्र आरइन्फ्रा–डीच्या आधारभूत आवश्यकतेची गरज पूर्ण करील. आव 13–14 या कालावधीसाठी उर्वरित मागणी सध्या अस्तित्वात असलेल्या, वर्धा पॉवर कंपनी लिमिटेड, अभिजीत एमएडीसी आणि व्हीआयपीएलच्या बुटिबोरी प्लँटसोबत केलेल्या मध्यम मुदतीच्या करारांमधून पूर्ण केली जाईल. हे मध्यम मुदतीचे करार सध्या लागू असून ते आव 13–14 पर्यंत वैध आहेत.

आव 14–15 पासून पुढे आरइन्फ्रा–डीने व्हीआयपीएलबरोबर 600 मेवॅ वीज प्राप्तीसाठी दीर्घ मुदतीचा करार केलेला आहे, ज्यासाठी भांडवली खर्च, दरपत्रक आणि पीपीए मान्यता यांच्यासाठी याचिका माननीय आयोगाकडे या आधीच दाखल केलेली आहे. हा प्रकल्प बुटिबोरी, नागपूर येथे वसलेला आहे. इतर खप वजा केल्यानंतर, व्हीआयपीएलपासूनची उपलब्धता सुमारे 540 मेवॅ एवढी असेल. आव 14–15 मध्ये मध्यम मुदतीचा करार संपल्यानंतर विजेची अतिरिक्त आवश्यकता सुमारे 530 मेवॅ एवढी आहे, जी, माननीय आयोगाने मान्यता दिल्यास, व्हीआयपीएलबरोबरच्या या नियामक पीपीएमधून पूर्ण केली जाईल.

**तक्ता 5: दीर्घ मुदतीच्या/मध्यम मुदतीच्या वीज खरेदीच्या व्यवस्थेचा सारांश**

**(कोटी रु.)**

| वीज प्राप्तीचा खर्च | आव 12–13 | आव 13–14 | आव 14–15 | आव 15–16 |
|---|---|---|---|---|
| डहाणू | 1,303.67 | 1,525.02 | 1,437.90 | 1,478.55 |
| सध्याचे मध्यम मुदतीचे करार | | | | |
| वर्धा | 986.45 | 793.68 | – | – |
| अभिजीत | 197.07 | 177.94 | – | – |
| व्हीआयपीएल | 497.78 | 511.75 | – | – |
| व्हीआयपीएलबरोबरची प्रस्तावित दीर्घ मुदतीची वीज खरेदीची व्यवस्था | 0.00 | 0.00 | 1,384.87 | 1,404.58 |
| एकूण दीर्घ/मध्यम मुदतीचे स्रोत | 2,984.97 | 3,008.40 | 2,822.77 | 2,883.13 |

आरइन्फ्रा–डीने आपल्या सौर नवीनीकरणयोग्य खरेदीची जबाबदारी पूर्ण करण्यासाठी डहाणू सोलर पॉवर प्रायव्हेट लिमिटेड (डीएसपीपीएल) बरोबर केलेल्या वीज खरेदी करारावर (ईपीए) 28 मार्च 2011 रोजी 40 मेवॅ सौर वीज (पीव्ही) सह्या केल्या.

बिगर–सौर आरपीओची पूर्तता करण्यासाठी आरइन्फ्रा–डीने विविध वीज प्राप्ती करार केलेले आहेत. सध्या अस्तित्वात असलेल्या करारांनंतर जर आरइन्फ्रा–डीच्या बिगर–सौर ऊर्जा खरेदीच्या जबाबदारीत कोणतीही तूट असल्यास ती नवीनीकरणयोग्य ऊर्जा प्रमाणपत्रांच्या (आरईसी) माध्यमातून पूर्ण केली जाईल.

**तक्ता 6: नवीनीकरणयोग्य स्रोतांच्या खरेदीचा सारांश**

| तपशील | आव 12–13 | आव 13–14 | आव 14–15 | आव 15–16 |
|---|---|---|---|---|
| सौर जबाबदारी (अगोदरच्या तुटीसह) मेगा युनिटस्मध्ये | 58.22 | 38.51 | 39.49 | 40.80 |
| सौर खरेदी (मेयू) | 60.00 | 60.00 | 60.00 | 60.00 |
| | | | | |
| बिगर–सौर जबाबदारी (मेयू) | 577.85 | 654.61 | 671.26 | 693.54 |
| अस्तित्वातील बिगर–सौर जबाबदारी (मेयू) | 186.93 | 226.35 | 226.35 | 226.95 |
| बिगर–सौर आरईसी खरेदी (मेयू) | 460.93 | 428.26 | 444.91 | 466.59 |
| **नवीनीकरणयोग्य खरेदीचा एकूण खर्च (कोटी रु.)** | **274.99** | **293.22** | **298.24** | **304.79** |

ऊर्जेच्या आधारभूत भारापेक्षा अधिकची आवश्यकता, म्हणजेच सर्वोच्च मागणीची आवश्यकता बाह्य बाजारपेठेतून अल्प मुदतीसाठी खरेदी करून तसेच व्यापारी, ऊर्जा विनिमय केंद्रे, व्यावसायिक आणि बंदिस्त ऊर्जा प्रकल्प यांच्याबरोबरच्या स्वतंत्र करारांच्या माध्यमातून पूर्ण केली जाईल तसेच राज्य असंतुलन समुच्चयनाच्या माध्यमातून इंटर–युटिलिटी हस्तांतरणाच्या माध्यमातून पूर्ण केली जाईल. आधारभूत आणि अत्युच्च मागणी पूर्ण करण्यासाठी खरेदीत वाढ करण्याबरोबरच माननीय आयोगाने निर्धारित केल्यानुसार आरपीओ लक्ष्यांची पूर्तता करण्यासाठी नवीनीकरणयोग्य ऊर्जाही प्राप्त केली जाईल. सौर स्रोतांपासूनची नवीनीकरणयोग्य ऊर्जा फक्त दिवसाच उपलब्ध असल्याने, तिचा विचार सर्वोच्च भाराची मागणी पूर्ण करण्यासाठी विचारात घेण्यात आलेली आहे.

आरइन्फ्रा–डी सर्वोच्च मागणीसाठीचे करार योग्यपणे आणि बाजारातील प्रचलित दरांनुसार केले जातील याची काळजी घेईल. ग्राहकांची मागणी पूर्ण केल्यानंतर काही अतिरिक्त ऊर्जा शिल्लक राहिल्यास ती बाजारातील दरांनुसार परवानाप्राप्त क्षेत्राच्या बाहेर विक्रीसाठी उपलब्ध असेल असे गृहीत धरण्यात आलेले आहे.

आव 12–13 साठीचे एसएलडीसी आकार हे माननीय आयोगाने 2011 च्या प्रकरण क्र. 181 मध्ये विचारात घेतल्यानुसारच विचारात घेतलेले आहेत. उर्वरित कालावधीसाठी आकारांचा अंदाज लावण्यासाठी वार्षिक 5% वाढ विचारात घेतलेली आहे.

माननीय आयोगाने दुसऱ्या नियंत्रण कालावधीसाठी 2011 च्या प्रकरण 158 मध्ये दिलेल्या आपल्या 23 नोव्हेंबर 2012 च्या आदेशात स्टँडबाय आकार 143.70 कोटी एवढे निश्चित केलेले आहेत. आजपर्यंत केलेल्या वास्तविक प्रदानाचे समायोजन केल्यानंतर व मागील कालावधीच्या समायोजनानंतर, वर्षनिहाय स्टँडबाय आकार खाली दिल्यानुसार आहेत:

**तक्ता 7: स्टँडबाय आकार (कोटी रु.)**

| तपशील | आव 12–13 | आव 13–14 | आव 14–15 | आव 15–16 |
|---|---|---|---|---|
| स्टँडबाय आकार (व्यवसाय योजना आदेश) | 143.70 | 143.70 | 143.70 | 143.70 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| प्रदान केलेले वास्तविक | 221.06 | | | |
| आव 13 मधील अतिरिक्त प्रदानासाठी मागील कालावधीमधील समायोजन | | 8.61 | | |
| आव 13 मधील अतिरिक्त प्रदानासाठी मागील कालावधीमधील समायोजन | | 68.75 | | |
| **स्टँडबाय आकार** | **221.06** | **66.34** | **143.7** | **143.7** |

वरील चर्चेवर आधारित खरेदी केलेल्या ऊर्जेच्या प्रमाणाचा सारांश खाली दिलेला आहे:

**तक्ता 8: वीज खरेदीचा सारांश (मेगा युनिटस्)**

| मेयू | आव 12-13 | आव 13-14 | आव 14-15 | आव 15-16 |
|---|---|---|---|---|
| ऊर्जेची आवश्यकता | 7,456.15 | 7,701.33 | 7,897.19 | 8,159.34 |
| **दीर्घ मुदतीची** | | | | |
| *डीटीपीएस* | 3,997.37 | 3,787.60 | 3,787.60 | 3,798.13 |
| *व्हीआयपीएल (दीर्घ मुदतीची)* | 0.00 | 0.00 | 4,047.82 | 4,058.91 |
| **मध्यम मुदत** | | | | |
| *वर्धा पॉवर* | 1,935.96 | 1,935.96 | - | - |
| *अभिजीत एमएडीसी* | 409.53 | 409.53 | - | - |
| *व्हीआयपीएल* | 997.76 | 997.76 | - | - |
| **नूतनीकरणयोग्य** | 246.93 | 286.35 | 286.35 | 287.12 |
| **अल्प मुदतीची खरेदी** | 514.53 | 746.44 | 493.34 | 631.09 |
| **एकूण** | 8,102.09 | 8,163.65 | 8,615.12 | 8,775.26 |
| **अधिक्य/(तूट)** | (645.94) | (462.32) | (717.93) | (615.91) |

ऊर्जा प्राप्तीच्या खर्चाचा सारांश येथे पुन्हा देत आहोत:

**तक्ता 9: वीज खरेदी खर्चाचा सारांश (कोटी रु.)**

| तपशील | आव 12-13 | आव 13-14 | आव 14-15 | आव 15-16 |
|---|---|---|---|---|
| **दीर्घ मुदतीची** | | | | |
| *डीटीपीएस* | 1,303.67 | 1,525.02 | 1,437.90 | 1,478.55 |
| *व्हीआयपीएल (दीर्घ मुदतीची)* | - | - | 1,384.87 | 1,404.58 |
| **मध्यम मुदत** | | | | |
| *वर्धा पॉवर* | 986.45 | 793.68 | - | - |
| *अभिजीत एमएडीसी* | 197.07 | 177.94 | - | - |
| *व्हीआयपीएल* | 497.78 | 511.75 | - | - |
| नूतनीकरणयोग्य | 274.99 | 293.22 | 298.24 | 304.79 |
| अल्प मुदतीची खरेदी | 236.90 | 353.98 | 240.97 | 317.51 |
| अतिरिक्त विक्रीपासून मिळालेली रक्कम | (195.60) | (144.20) | (230.64) | (203.81) |
| एसएलडीसी आकार | 1.05 | 1.10 | 1.16 | 1.22 |
| स्टँडबाय आकार | 221.06 | 66.34 | 143.70 | 143.70 |
| **पारेषण आकारांशिवाय वीज खरेदीचा एकूण खर्च** | **3,523.37** | **3,578.84** | **3,276.20** | **3,446.53** |
| पारेषण आकार | 265.39 | 278.66 | 292.59 | 307.22 |
| **पारेषण आकारांसहित वीज खरेदीचा एकूण खर्च** | **3,788.76** | **3,857.50** | **3,568.79** | **3,753.75** |

### 1.3.4. भांडवली खर्च आणि भांडवलीकरण

आरइन्फ्रा-डीने आव 12-13 ते आव 15-16 साठी भांडवली खर्चाची योजना, प्रणालीच्या कमाल मागणीच्या पूर्वानुमानावर आधारित, नवीन भाराशी संबंधित पुरवठ्याच्या क्षेत्रातील अपेक्षित घडामोडी, सध्याच्या मालमत्तांच्या ऐवजी दुसऱ्या मालमत्ता, नवीन भारानुसार सशक्त बनविणे व आधुनिक करणे, इत्यादींच्या सहाय्याने तयार केलेली आहे. भांडवली खर्चाची योजना पारेषण पातळीवरील घडामोडींशीही सहकार्य करते आणि पारेषण डिलिव्हरी पॉईंटशी जोडणीसाठी व तेथे वीज स्थलांतरित घेण्यासाठी आवश्यक असलेल्या पायाभूत सुविधांसाठीच्या घडामोडींचे अंदाज लावते.

आयआयटी मुंबईने (आयआयटीबी) केलेल्या अभ्यासाच्या आधारे आरइन्फ्रा–डीने त्यानुसार गणना केलेल्या मागणीचे पूर्वानुमानाचा वापर, बहुवर्षीय भांडवली खर्चाची योजना तयार करण्यासाठी केलेला आहे. आयआयटीबीच्या अभ्यासात आरइन्फ्रा–डीची मागील काळातील मागणी, ग्रॉस डिस्ट्रिक्ट डोमेस्टिक प्रॉडक्ट ग्रोथ (मुंबईसाठी जीडीडीपी) अशा घटकांचा व इतर घटकांचा वापर, 17 वर्षांच्या ऐतिहासिक माहितीच्या आधारे, कमाल मागणीची आकडेवारी प्राप्त करण्यासाठी आणि तिच्याशी जोडलेली भांडवल गुंतवणुकीची आवश्यकता प्राप्त करण्यासाठी केला.

त्यानंतर, आरइन्फ्रा–डीने सादर केलेल्या व्यवसाय योजनेत आव 11–12 साठीच्या भांडवली खर्चाचे पूर्वानुमान दिलेले आहे (डिसेंबर 2011 पर्यंतच्या वास्तविक आकडेवारीच्या आधारे). तथापि, सध्याच्या या याचिकेच्या वेळी, आव 11–12 मध्ये विविध योजनांसाठी केलेला भांडवली खर्च माहीत झालेला आहे आणि म्हणून नियंत्रण न ठेवता येण्याजोग्या विविध कारणांमधील दिरंगाई, स्लिपेजेस, ओव्हर–रन्स, इत्यादीही माहीत झालेले आहेत. आव 11–12 मध्ये अगदी थोड्या प्रमाणात रक्कम कमी खर्च झालेली आहे, जी आव 12–13 पासूनच्या पुढील काळात विभागली जाईल. त्यानुसार, या योजनेंतर्गत सादर केलेली भांडवली खर्चाची योजना, व्यवसाय योजनेत सादर केलेल्यापेक्षा जराशी वेगळी आहे.

वायर्स आणि किरकोळ व्यवसायासाठीचा प्रस्तावित एकत्रित भांडवली खर्चाचा सारांश खाली दिलेला आहे:

**तक्ता 10: प्रस्तावित भांडवली खर्चाचा सारांश (कोटी रु.)**

| तपशील | आव 12–13 | आव 13–14 | आव 14–15 | आव 15–16 |
|---|---|---|---|---|
| भांडवली खर्च – वितरण वायर्स व्यवसाय | 300.38 | 468.26 | 412.37 | 409.30 |
| भांडवली खर्च – किरकोळ पुरवठा व्यवसाय | 34.24 | 37.93 | 38.57 | 40.03 |
| **एकूण भांडवली खर्च** | **334.62** | **506.18** | **450.94** | **449.32** |

त्याचप्रमाणे, किरकोळ आणि वायर्स व्यवसायासाठीची भांडवलीकरणाची योजना खालील तक्त्यात दिलेली आहे:

**तक्ता 11: प्रस्तावित भांडवलीकरणाचा सारांश (कोटी रु.)**

| तपशील | आव 12–13 | आव 13–14 | आव 14–15 | आव 15–16 |
|---|---|---|---|---|
| भांडवलीकरण – वितरण वायर्स व्यवसाय | 330.61 | 355.59 | 452.21 | 457.27 |
| भांडवलीकरण – किरकोळ पुरवठा व्यवसाय | 34.51 | 36.43 | 41.45 | 40.41 |
| **एकूण भांडवलीकरण** | **365.12** | **392.03** | **493.66** | **497.68** |

### 1.3.5. घसारा

एकदा घसारा किमतीच्या 70% मूल्यापर्यंत पोहोचला की त्यानंतर विविध भांडवली दरांचा हिशेब करण्यासाठी आणि सॅल्व्हेज व्हॅल्यू इफेक्ट विचारात घेण्यासाठीही आरइन्फ्रा–डीच्या या दुसऱ्या नियंत्रण कालावधीसाठीच्या एमवायटी याचिकेत घसाऱ्याची गणना दोन भागांत खाली दिल्यानुसार केलेली आहे:

- 1 एप्रिल 2012 रोजीनुसार, सुरुवातीच्या जीएफएसहितची मालमत्ता आणि तिच्यावरील संबंधित तोपर्यंतचा घसारा विचारात घेतला होता. सॅप सिस्टीममधील क्वेरीच्या आधारे ॲसेट डेटाबेसवरघसाऱ्याची गणना केली गेलेली आहे, ती एमवायटी नियमावली 2011 मधील अटींनुसारच आहे.

- आव 12–13 ते आव 15–16 या कालावधीत नव्याने भांडवलीकरण केलेल्या मालमत्तेवरील घसारा: आव 12–13 ते आव 15–16 या कालावधीत नव्याने भांडवलीकरण केलेल्या मालमत्तेच्या बाबतीत, हेच तत्त्व अवलंबून, एमवायटी नियमावली 2011 मध्ये निर्धारित केलेल्या दरांनुसार आणि उपयुक्त आयुर्मानानुसार, स्ट्रेट लाईन बेसिसवर घसाऱ्याची गणना केलेली आहे. या संवर्गातील कोणतीही मालमत्ता एमवायटी कालावधीमध्ये तिच्या 70% मूल्यापर्यंत पहोचणार नाही.

आरइन्फ्रा–डीने विचारात घेतलेल्या घसाऱ्याचा सारांश खाली दिलेला आहे:

**तक्ता 12: घसाऱ्याचा सारांश (कोटी रु.)**

| तपशील | आव 12–13 | आव 13–14 | आव 14–15 | आव 15–16 |
|---|---|---|---|---|
| घसारा ड्डु वायर्स | 166.12 | 182.48 | 202.71 | 224.75 |
| घसारा – किरकोळ पुरवठा | 16.69 | 18.52 | 20.45 | 22.42 |
| **एकूण घसारा** | **182.81** | **201.00** | **223.16** | **247.17** |

### 1.3.6. दीर्घकालीन भांडवलावरील व्याज

आव 11–12 पासून आरइन्फ्रा–डीने सर्व भांडवलीकरणासाठी निधी उभारण्यासाठी आपल्या इक्विटी पूलमधून हा निधी उभारण्याच्या पारंपरिक पद्धतींपेक्षा वेगळा विचार केलेला आहे आणि अर्थपुरवठा करणाऱ्या संस्था आणि वाणिज्यिक बँका यांच्याशी कर्जपुरवठ्यासाठी सहकार्य करार केलेला आहे. आरइन्फ्रा–डीने रूपांतर न करतायेण्याजोग्या कर्जरोख्यांच्या (एनसीडी) माध्यमातून आव 11–12 मध्ये 1000 कोटी रुपये उभे केलेले आहेत. आरइन्फ्रा–डीने सेंट्रल बँक ऑफ इंडियाकडून 350 कोटी रुपयांचे कर्जही घेतलेले आहे, ज्यासाठी आरइन्फ्रा–डीने कर्जाचे वितरण होण्यापूर्वी, निर्माण केलेल्या व त्यांचे भांडवलीकरण केलेल्या मालमत्तांचे तारण दिलेले आहे.

दीर्घकालीन भांडवलापासूनच्या व्याजाची गणना करण्यासाठी आरइन्फ्रा–डीने सध्या अस्तित्वात असलेल्या कर्जासाठी लागू असलेल्या दराने व्याज विचारात घेतलेले आहे. नवीन कर्जांसाठी, माननीय आयोगाने व्यवसाय योजनेत निर्देश दिल्यानुसार 11.5% दराने व्याज विचारात घेतलेले आहे. यासाठी परतफेड ही एमवायटी नियमावली 2011 नुसार घसाऱ्याच्या रकमेएवढी विचारात घेतलेली आहे.

व्याजावरील खर्चाचा सारांश खाली दिल्यानुसार आहे

**तक्ता 13: व्याजाचा सारांश (कोटी रु.)**

| तपशील | आव 12–13 | आव 13–14 | आव 14–15 | आव 15–16 |
|---|---|---|---|---|
| व्याज – वायर्स | 143.88 | 152.21 | 163.33 | 176.10 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| व्याज – किरकोळ पुरवठा | 16.54 | 17.46 | 18.44 | 19.35 |
| **एकूण व्याज** | **160.43** | **169.67** | **181.77** | **195.45** |

### 1.3.7. प्रचालन आणि देखभाल खर्च

एमवायटी नियमावली 2011 मध्ये माननीय आयोगाने नियंत्रण कालावधीच्या प्रत्येक वर्षासाठी, वायर्स आणि किरकोळ पुरवठा व्यवसायासाठी प्रचालन आणि देखभाल (ओ अँड एम) खर्चाच्या वसुलीसाठी मापदंड निर्धारित केलेले आहेत. आरइन्फ्रा–डीने अधिसूचित एमवायटी नियमावली 2011 च्या संबंधात विविध कारणास्तव माननीय आयोगाकडे 25 मार्च 2011 रोजी याचिका दाखल केलेली आहे. वर उल्लेख केलेल्या याचिकेत (माननीय आयोगाने 2011 च्या प्रकरण 145 अंतर्गत निर्णय दिल्यानुसार), अधिसूचित केलेल्या अंतिम एमवायटी नियमावली 2011 मध्ये निर्धारित केलेल्या मापदंडांमुळे आरइन्फ्रा–डीला तोंड द्याव्या अडचणींचा स्पष्टपणे उल्लेख केलेला आहे. आरइन्फ्रा–डीने स्पष्टपणे असा उल्लेख केलेला आहे की, एमवायटी नियमावलीत निर्धारित केलेल्या मापदंडांमुळे खर्चाच्या पातळीत वाढ झालेली आहे, जे आरइन्फ्रा–डीने प्रत्यक्षात केलेल्या व त्याला माननीय आयोगाने मागील वर्षात मंजुरी दिलेल्या खर्चापेक्षा कितीतरी प्रमाणात कमी होते.

तथापि, माननीय आयोगाने व्यवसाय योजनेत दिलेल्या आदेशात (2011 चे प्रकरण क्र. 158), आरइन्फ्रा–डीच्या संपूर्ण म्हणण्याचा उल्लेख करीत असताना, आरइन्फ्रा–डीच्या या म्हणण्यावर कोणताही स्पष्ट निकाल दिलेला नाही आणि एमवायटी नियमावली 2011 अनुसार एमवायटी कालावधीच्या प्रत्येक वर्षासाठी फक्त प्रचालन आणि देखभाल खर्चाची गणना केलेली आहे. आरइन्फ्रा–डीचे म्हणणे असे आहे की, माननीय आयोगाने कृपया, एमवायटी नियमावली 2011 च्या निमय 100 अंतर्गत (अडचणी दूर करण्याचे अधिकार) आपल्या निर्णयाचा पुनर्विचार करावा, ज्यायोगे एमवायटी कालावधीसाठी प्रचालन आणि देखभाल खर्चाला अधिक प्रतिनिधित्व दिले जावे, जो मागील काळातील खर्चाशी संबंधित आहे.

आरइन्फ्रा–डीने पूर्वानुमान लावलेल्या प्रचालन आणि देखभाल खर्चाचा सारांश खाली दिलेला आहे:

**तक्ता 14: प्रचालन आणि देखभाल खर्चाचा सारांश (कोटी रु.)**

| तपशील | आव 12–13 | आव 13–14 | आव 14–15 | आव 15–16 |
|---|---|---|---|---|
| कर्मचाऱ्यांवरील खर्च | 537.26 | 543.40 | 593.83 | 648.94 |
| प्रशासकीय व सामान्य खर्च | 171.54 | 185.78 | 201.22 | 217.94 |
| दुरुस्ती व देखभाल खर्च | 229.79 | 213.82 | 228.83 | 244.89 |
| **एकूण प्रचालन व देखभाल खर्च** | **938.59** | **943.00** | **1023.87** | **1111.77** |

### 1.3.8. समभागावरील परतावा

आव 12–13 ते आव 15–16 साठी समभागावरील परताव्याची गणना, वर्षाच्या सुरुवातीच्या समभाग भांडवलावर तसेच वर्षभरात भांडवलीकरण केलेल्या मालमत्तेच्या 50% भागावर, एमवायटी दरपत्रक नियमावली 2011 च्या नियम 32.2 अनुसार, म्हणजेच 15.5% दराने (किरकोळ व्यवसायासाठी हा दर 17.5% आहे) केलेली आहे. विचारात घेतलेल्या समभागावरील परताव्याचा सारांश खाली दिलेला आहे:

**तक्ता 15: समभागावरील परताव्याचा सारांश (कोटी रु.)**

| तपशील | आव 12–13 | आव 13–14 | आव 14–15 | आव 15–16 |
|---|---|---|---|---|
| समभागावरील परतावा – वायर्स | 227.32 | 242.05 | 259.52 | 279.25 |
| समभागावरील परतावा – किरकोळ पुरवठा | 28.09 | 29.62 | 31.34 | 33.17 |
| **समभागावरील एकूण परतावा** | **255.41** | **271.67** | **290.87** | **312.42** |

**1.3.9. खेळत्या भांडवलावरील व्याज**

आव 12–13 ते आव 15–16 साठी खेळत्या भांडवलाच्या आवश्यकतेची गणना, एमवायटी दरपत्रक नियमावली 2011 च्या नियम 35.2 नुसार केली गेलेली आहे.

**1.3.10. आकस्मिकता राखीव निधीसाठी वर्गणी**

एमवायटी नियमावली 2011 मध्ये आकस्मिकता राखीव निधीसाठीची (सीआर) तरतूद सुरुवातीच्या जीएफएच्या 0.25% एवढी केलेली आहे. योजना कालावधीच्या प्रत्येक वर्षासाठी तीच विचारात घेतलेली आहे.

**1.3.11. आयकर**

आरइन्फ्रा–डीने आपल्या व्यवसाय योजनेसह दाखल केलेल्या अगोदरच्या याचिकेत, माननीय एटीईने दिलेल्या विविध निकालांच्या अर्थाशी संबंधित तपशीलवार सादरीकरण केलेले आहे, ज्यात 2007 चे अपील क्र. 90 आणि 2009 चे अपील क्र. 173 आणि 174 चाही समावेश आहे. तथापि, माननीय आयोगाने 2011 च्या प्रकरण क्र. 158 मध्ये आरइन्फ्रा–डीच्या दुसऱ्या नियंत्रण कालावधीच्या व्यवसाय योजना याचिकेवर दिलेल्या आपल्या आदेशात या म्हणण्याचा विचार केला नाही आणि एमवायटी कालावधीसाठीचा आयकर, 2011 च्या प्रकरण क्र. 180 मध्ये दिलेल्या आव 10–11 साठीच्या आपल्या आदेशाच्या पातळीतच मंजूर केला.

आरइन्फ्रा–डीवर आयोगाने आयकराच्या बाबतीत अंगीकारलेल्या या दृष्टिकोनामुळे अन्याय झाल्याने त्यांनी माननीय एटीईकडे अपील दाखल केले आणि या अपीलावर जो निकाल दिला जाईल, त्याचा माननीय आयोग जेव्हा एमवायटी कालावधीच्या कोणत्याही वर्षासाठीची वास्तविक आकडेवारी विचारात घेईल, तेव्हा आयकराबद्दल विचार करण्यावर त्याचा परिणाम होईल.

तथापि, या सध्याच्या याचिकेसाठी आयकराचे फक्त पूर्वानुमानच लावले जात असल्याने, आरइन्फ्रा–डीने एमवायटी कालावधीच्या प्रत्येक वर्षासाठीचा आयकर, माननीय आयोगाने 2011 च्या प्रकरण 158 मध्ये व्यवसाय योजनेत दिलेल्या आदेशानुसारच विचारात घेतलेला आहे.

**1.3.12. दरपत्रकाव्यतिरिक्तचे उत्पन्न**

माननीय आयोगाने 2011 च्या प्रकरण 158 मध्ये दिलेल्या आदेशात आव 11–12 साठी 156.45 कोटी रुपये एवढ्या दरपत्रकाव्यतिरिक्तच्या उत्पन्नाला मान्यता दिलेली आहे. आव 11–12 साठीचे दरपत्रकाव्यतिरिक्तचे वास्तविक उत्पन्न 198.20 कोटी रुपये एवढे होते. आरइन्फ्रा–डीने आपल्या आव 11–12 च्या ट्रू अप याचिकेत दरपत्रकाव्यतिरिक्तच्या उत्पन्नातील फरकाचे समामेलन केलेले आहे (2012 चे प्रकरण 124). दरपत्रकाव्यतिरिक्तच्या उत्पन्नाचे अंदाज वर्तविण्यासाठी वापरण्यात आलेल्या दृष्टिकोनाविषयी खाली स्पष्टीकरण दिलेले आहे:

(क) ग्राहकांकडूनची संकीर्ण प्राप्ती (कोणत्याही वेळी मिळणारी थकबाकी वगळून), जळेलेल्या मीटरसाठीचा आकार, जोडण्या, पुनर्जोडणी शुल्क, इत्यादींसारख्या, आकारांच्या अनुसूचीचा परिणाम होणाऱ्या बाबींसाठी, माननीय आयोगाने आकारांच्या अनुसूचीत सुधारणा केलेली आहे, ही बाब लक्षात घेऊन, आव 11–12 च्या मूल्यावर 10% अधिक वाढ पूर्वानुमानित केलेली आहे.

(ख) उशिरा प्राप्त झालेली प्रदाने, विलंबित प्रदानांवरील व्याज इत्यादींसारख्या बाबींसाठी, आव 12–13 पासून पुढील कालावधीसाठी पूर्वानुमाने तयार करण्यासाठी आव 11–12 च्या मूल्यावर 10% अधिक वाढ लागू करण्याचा असाच दृष्टिकोन अवलंबिलेला आहे.

(ग) विजेच्या चोरीमुळे झालेली वसुलीचे पूर्वानुमान लावताना कोणतीही वाढ अनुमानित केलेली नाही, तर त्यासाठी आव 11–12 च्या वास्तविक आकडेवारीच्या पातळीचा विचार केलेला आहे.

(घ) वीज खरेदीवरील सूट आणि आकस्मिकता राखीव निधीच्या गुंतवणुकीवरील व्याज यांसारख्या बाबींसाठी विशिष्ट दृष्टिकोन अवलंबिण्यात आलेला आहे व त्याचे स्पष्टीकरण या याचिकेच्या संबंधित विभागात दिलेले आहे.

**1.3.13. इतर व्यवसायांपासूनचे उत्पन्न**

आरइन्फ्रा–डी, देवीदास लेन कार्यालयाचे भाडे आणि जमिनीच्या वापरासाठीचा आकार यांसारख्या, सध्या आरइन्फ्राच्या सामायिक मालमत्तांच्या वापरासाठी जो खर्च करीत आहे, त्याची वसुली विचारात घेतलेली आहे.

**1.3.14. किरकोळ पुरवठा ग्राहकांकडील सुरक्षा अनामतीवरील व्याज**

किरकोळ पुरवठा ग्राहकांकडील सुरक्षा अनामतीवरील व्याजाच्या पूर्वानुमानासाठी सध्याचा 9% हा बँक दर विचारात घेतलेला आहे.

**1.3.15. टीपीसी–जीशी संबंधित मागील काळातील झालेली कमी वसुली**

माननीय आयोगाने 2012 च्या प्रकरण क्र. 55 मध्ये निर्देश दिल्यानुसार, आरइन्फ्रा–डीने मागील काळातील कमी झालेली आरइन्फ्रा–डीशी संबंधित 84.50 कोटी रुपयांची वसुली, एमवायटी याचिकेत आव 13–14 मध्ये खर्च म्हणून विचारात घेतलेली आहे

**1.3.16 वार्षिक महसुलाची आवश्यकता**

खालील तक्त्यात दुसऱ्या नियंत्रण कालावधीसाठी आरइन्फ्रा–डीच्या वितरण वायर्स व्यवसायाच्या वार्षिक महसुलाच्या आवश्यकतेचा सारांश दिलेला आहे:

**तक्ता 16: वितरण वायर्स व्यवसायासाठी वार्षिक महसुलाची आवश्यकता (कोटी रु.)**

| तपशील | आव 12–13 | आव 13–14 | आव 14–15 | आव 15–16 |
|---|---|---|---|---|
| प्रचालन व देखभाल खर्च | 633.75 | 631.38 | 684.23 | 741.59 |
| घसारा | 166.12 | 182.48 | 202.71 | 224.75 |
| दीर्घकालीन भांडवली कर्जावरील व्याज | 143.88 | 152.21 | 163.33 | 176.10 |
| खेळत्या भांडवलावरील व ग्राहक सुरक्षा अनामतीवरील व्याज | 21.03 | 20.92 | 18.86 | 20.24 |
| आयकर | 7.70 | 7.70 | 7.70 | 7.70 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| आकस्मिकता राखीव निधीसाठी वर्गणी | 9.11 | 9.92 | 10.79 | 11.91 |
| एकूण महसुली खर्च | 981.59 | 1004.61 | 1087.62 | 1182.29 |
| समभाग भांडवलावरील परतावा | 227.32 | 242.05 | 259.52 | 279.25 |
| **एकत्रित महसुलाची आवश्यकता** | **1208.91** | **1246.66** | **1347.14** | **1461.55** |
| वजा: दरपत्रकाव्यतिरिक्तचे उत्पन्न | 13.76 | 15.44 | 17.29 | 19.32 |
| वजा: इतर व्यवसायांपासूनचे उत्पन्न | 5.03 | 5.28 | 5.72 | 6.16 |
| **वायर्स व्यवसायापासूनच्या एकत्रित महसुलाची आवश्यकता** | **1190.12** | **1225.93** | **1324.14** | **1436.07** |

खालील तक्त्यात दुसऱ्या नियंत्रण कालावधीसाठी आरइन्फ्रा–डीच्या किरकोळ पुरवठा व्यवसायाच्या वार्षिक महसुलाच्या आवश्यकतेचा सारांश दिलेला आहे:

**तक्ता 17: किरकोळ पुरवठा व्यवसायासाठी वार्षिक महसुलाची आवश्यकता (कोटी रु.)**

| तपशील | आव 12-13 | आव 13-14 | आव 14-15 | आव 15-16 |
|---|---|---|---|---|
| वीज खरेदी खर्च | 3523.37 | 3578.84 | 3276.20 | 3446.53 |
| प्रचालन व देखभाल खर्च | 304.84 | 311.62 | 339.64 | 370.19 |
| घसारा | 16.69 | 18.52 | 20.45 | 22.42 |
| दीर्घकालीन भांडवली कर्जावरील व्याज | 16.54 | 17.46 | 18.44 | 19.35 |
| खेळत्या भांडवलावरील व ग्राहक सुरक्षा अनामतीवरील व्याज | 70.26 | 84.93 | 84.92 | 91.14 |
| आयकर | 46.17 | 46.17 | 46.17 | 46.17 |
| पारेषण आकार – राज्यांतर्गत | 265.39 | 278.66 | 292.59 | 307.22 |
| आकस्मिकता राखीव निधीसाठी वर्गणी | 1.27 | 1.34 | 1.41 | 1.50 |

| तपशील | आव 12–13 | आव 13–14 | आव 14–15 | आव 15–16 |
|---|---|---|---|---|
| एकूण महसुली खर्च | 4244.53 | 4337.54 | 4079.82 | 4304.52 |
| समभाग भांडवलावरील परतावा | 28.09 | 29.62 | 31.34 | 33.17 |
| **एकत्रित महसुलाची आवश्यकता** | **4272.62** | **4367.16** | **4111.16** | **4337.69** |
| वजा: दरपत्रकाव्यतिरिक्तचे उत्पन्न | 155.08 | 164.47 | 174.45 | 189.30 |
| अधिक: टीपीसी–जी प्रभार | 0 | 84.50 | 0 | 0 |
| **किरकोळ पुरवठा व्यवसायापासूनची एकत्रित महसुलाची आवश्यकता** | **4117.54** | **4287.19** | **3936.71** | **4148.39** |

खालील तक्त्यात दुसऱ्या नियंत्रण कालावधीसाठी आरइन्फ्रा–डीच्या किरकोळ पुरवठा व्यवसायाच्या व वितरण वायर्स व्यवसायाच्या संयुक्त व्यवसायासाठी वार्षिक महसुलाच्या आवश्यकतेचा सारांश दिलेला आहे:

**तक्ता 17: संयुक्त व्यवसायासाठी (वायर्स + किरकोळ) वार्षिक महसुलाची आवश्यकता (कोटी रु.)**

| तपशील | आव 12–13 | आव 13–14 | आव 14–15 | आव 15–16 |
|---|---|---|---|---|
| वीज खरेदी खर्च | 3523.37 | 3578.84 | 3276.20 | 3446.53 |
| प्रचालन व देखभाल खर्च | 938.59 | 943.00 | 1023.87 | 1111.77 |
| घसारा | 182.81 | 201.00 | 223.16 | 247.17 |
| दीर्घकालीन भांडवली कर्जावरील व्याज | 160.43 | 169.67 | 181.77 | 195.45 |
| खेळत्या भांडवलावरील व ग्राहक सुरक्षा अनामतीवरील व्याज | 91.29 | 105.85 | 103.78 | 111.39 |
| आयकर | 53.87 | 53.87 | 53.87 | 53.87 |
| पारेषण आकार – राज्यांतर्गत | 265.39 | 278.66 | 292.59 | 307.22 |
| आकस्मिकता राखीव निधीसाठी वर्गणी | 10.38 | 11.26 | 12.21 | 13.41 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| एकूण महसुली खर्च | 5226.12 | 5342.15 | 5167.44 | 5486.81 |
| समभाग भांडवलावरील परतावा | 255.41 | 271.67 | 290.87 | 312.42 |
| **एकत्रित महसुलाची आवश्यकता** | **5481.53** | **5613.82** | **5458.31** | **5799.23** |
| वजा: दरपत्रकाव्यतिरिक्तचे उत्पन्न | 168.83 | 179.91 | 191.74 | 208.62 |
| वजा: इतर व्यवसायापासूनचे उत्पन्न | 5.03 | 5.28 | 5.72 | 6.16 |
| अधिक: टीपीसी–जी प्रभार | 0.00 | 84.50 | 0.00 | 0.00 |
| **संयुक्त व्यवसायापासूनची (वायर्स + किरकोळ) एकत्रित महसुलाची आवश्यकता** | **5307.66** | **5513.13** | **5260.85** | **5584.46** |

**1.4. मागील महसुलातील तफावतीची वसुली**

आरइन्फ्रा–डीचे म्हणणे असे आहे की, महसुली तफावतींसह, आव 11–12 पर्यंतची महसुलातील संकलित तफावत 3674.42 कोटी रुपये आहे. माननीय आयोगाने असा निर्णय दिलेला आहे की, नियामक मालमत्ता स्वतःच्या ग्राहकांकडून (गट 1) आणि चेंजओव्हर ग्राहकांकडून (गट 2) वसूल केल्या जाऊ शकतात, स्वीचओव्हर ग्राहकांकडून (गट 3) नाही. आरइन्फ्रा–डीने माननीय एटीईकडे अपील दाखल केलेले आहे (2011 चे अपील क्र. 140), ज्यात अशी विनंती करण्यात आलेली आहे की, गट 3 मधील ग्राहकांकडूनही नियामक मालमत्तांची वसुली करता यायला हवी.

आरइन्फ्रा–डीच्या वरील अपीलावरील माननीय एटीईचा निर्णय प्रलंबित आहे आणि गट 3 मधील ग्राहकांकडून (स्वीचओव्हर) जर काही वसुली करायचीच असेल, तर ती त्यानुसार आरइन्फ्रा–डीच्या अपीलावर माननीय एटीईने दिलेल्या निर्णयावर अवलंबून आहे. त्यानुसार, या एमवायटी याचिकेत, आरइन्फ्रा–डीने जरी गट 1 आणि गट 2 ग्राहकांकडून संकलित महसुलातील मंजूर तफावतीच्या वसुलीची योजना सादर केलेली असली, तरी ती सध्याच्या व प्रलंबित असलेल्या एटीईकडील अपीलांमध्ये व्यक्त केलेल्या/व्यक्त करण्यात येणार असलेल्या आशयाला कोणतीही बाधा न आणता सादर केलेली आहे.

आरइन्फ्रा–डी आव 11–12 पर्यंत 3674.42 कोटी रुपयांची महसुलातील संकलित तफावत, आरइन्फ्रा–डीच्या स्वतःच्या आणि चेंजओव्हर ग्राहकांमध्ये, आरइन्फ्रा–डी आणि चेंजओव्हर ग्राहकांना केलेल्या विक्रीच्या प्रमाणात वाटून देण्याचा प्रस्ताव ठेवीत आहे. आरइन्फ्रा–डी महसुलातील सदर तफावतीची वसुली आव 13–14 ते आव 18–19 या कालावधीमध्ये, म्हणजेच आव 13–14 पासून सहा वर्षांच्या कालावधीमध्ये वसूल करण्याचे प्रस्तावित करीत आहे, ज्यामुळे ग्राहकांना दरपत्रकातील वाढीचा धक्का बसणार नाही. नियामक मालमत्ता आरइन्फ्रा–डीच्या स्वतःच्या ग्राहकांकडून आणि टीपीसी–डीकडे स्थलांतरित झालेल्या ग्राहकांकडून वसूल करावयाच्या असल्याने, आरइन्फ्रा–डीने या याचिकेत असे प्रस्तावित केलेले आहे की, नियामक मालमत्तांची वसुली स्वतंत्रपणे केली जावी व त्यांचे विलीनीकरण किरकोळ दराबरोबर किंवा किरकोळ दरांबरोबर केले जाऊ नये.

नियामक मालमत्ता आकाराचा सारांश खाली दिलेला आहे:

**तक्ता 19: सरासरी मालमत्ता आकारांचा सारांश (रु./युनिट)**

| तपशील | आव 13–14 | आव 14–15 | आव 15–16 |
|---|---|---|---|
| आरइन्फ्रा–डीच्या स्वत:च्या ग्राहकांकडून आरए आकार (रु. प्रति किवॅतास) | 1.09 | 1.06 | 1.02 |
| चेंज ओव्हर ग्राहकांकडून आरए आकार (रु. प्रति किवॅतास) | 0.92 | 0.88 | 0.83 |

वरील सरासरी आकारांचे रूपांतर, मंजूर केलेल्या एमवायटी आदेशामध्ये उपलब्ध असलेल्या ''के'' घटकाच्या आधारे संवर्ग–निहाय आकारांमध्ये केले जाईल. सध्या ज्या प्रकारे ग्राहकांच्या स्वतंत्र वर्गासांठी एफएसी आकारांची गणना करण्यासाठी केले जाते, त्यानुसार कोणत्याही संवर्गाचा ''के'' घटक म्हणजे मंजूर केलेला अशा संवर्गासाठीचा एबीआर (बिलिंगचा सरासरी दर) असेल व त्याला मंजूर सीओएसने (पुरवठ्याचा सरासरी खर्च) भागले जाईल व तो आरइन्फ्रा–डीसाठी एमवायटी कालावधीच्या कोणत्याही वर्षासाठी असेल.

**1.5. व्हिलिंग आकार**

व्हिलिंग आकारांपासूनच्या उत्पन्नाचा अंदाज लावण्यासाठी आरइन्फ्रा–डीने आव 12–13 या कालावधीसाठी व्हिलिंग आकारांमध्ये कोणतीही सुधारणा विचारात घेतलेली नाही. दुसऱ्या नियंत्रण कालावधीच्या उर्वरित वर्षांसाठी, म्हणजेच आव 13–14 पासून आव 15–16 पर्यंत पूर्वानुमानित वायर्स महसुलाची आवश्यकता ही, आरइन्फ्रा–डीच्या स्वत:च्या व चेंजओव्हर ग्राहकांसहित, आरइन्फ्रा–डीच्या नेटवर्किंगला जोडलेल्या ग्राहकांकडून वसूल करण्याचे प्रस्तावित करण्यात आलेले आहे. ही वसुली एमवायटी याचिकेत पूर्वानुमानित केल्यानुसार संबंधित वर्षाच्या ऊर्जा विक्रीच्या प्रमाणात असेल व त्यानुसार, प्रतियुनिट सुधारित एचटी आणि एलटी व्हिलिंग आकार, आव 13–14 ते आव 15–16 या कालावधीसाठी निश्चित करण्यात आलेले आहेत.

आरइन्फ्रा–डीने निश्चित केलेले व्हिलिंग आकार खालीलप्रमाणे आहेत:

**तक्ता 20: व्हिलिंग आकारांचा सारांश (रु./युनिट)**

| लागू असलेले व्हिलिंग आकार | आव 12–13 | आव 13–14 | आव 14–15 | आव 15–16 |
|---|---|---|---|---|
| एचटी (रु. प्रति किवॅतास) | 0.46 | 0.83 | 1.00 | 1.04 |
| एलटी (रु. प्रति किवॅतास) | 0.88 | 1.58 | 1.89 | 1.99 |

**1.6. क्रॉस सबसिडी अधिभार**

आरइन्फ्रा–डीने दुसऱ्या नियंत्रण कालावधीच्या सीएसएसचा अंदाज वर्तविण्यासाठी खालील सूत्राचा वापर केलेला आहे. CSS = T – [C / (1-L %) + D]

- ज्यात सीएसएस म्हणजे संबंधित वर्षाचा क्रॉस सबसिडी अधिभार, टी म्हणजे संबंधित वर्षासाठी ग्राहकांच्या संबंधित संवर्गाकडून देय असलेले भाडे (टॅरिफ), सी म्हणजे संबंधित वर्षासाठी द्रवरूप इंधनावर आधारित विद्युतनिर्मिती आणि नूतनीकरणयोग्य वीज वगळून सर्वात वरच्या 5% वीज खरेदीची वेटेड अॅव्हरेज कॉस्ट, डी म्हणजे संबंधित वर्षासाठी लागू असलेला व्हिलिंग अधिभार, एल म्हणजे लागू असलेल्या व्होल्टेजच्या पातळीसाठी प्रणालीतील तोटा, जो टक्केवारीच्या रूपाने दाखविलेला असतो.

आरइन्फ्रा–डीने गट 3 मधील ग्राहकांसह सर्व स्थलांतरित होणाऱ्या ग्राहकांकडून क्रॉस सबसिडी आकार वसूल करण्यासाठी माननीय एटीएकडे अपील (2011 च्या अपील क्र. 140 अंतर्गत) दाखल केलेले आहे. तथापि, या एमवायटी याचिकेत, क्रॉस सबसिडी आकाराची वसुली, माननीय एटीईकडे किंवा अन्य न्यायिक प्राधिकरणाकडे केलेल्या सादरीकरणास कोणतीही बाधा न आणता, फक्त गट 2 मधील (चेंजओव्हर) ग्राहकांकडून विचारात घेतलेली आहे.

वर उल्लेख केलेल्या सूत्राच्या आधारे, दुसऱ्या नियंत्रण कालावधीसाठी निश्चित केलेला संवर्गनिहाय सीएसएस खाली दिलेला आहे.

**तक्ता 21: ग्राहक संवर्गनिहाय सीएसएस (रु./युनिट) – आव 12–13 ते आव 15–16**

| तपशील | अस्तित्वातील/आव 12–13 | आव 13–14 | आव 14–15 | आव 15–16 |
|---|---|---|---|---|
| **एलटी** | | | | |
| एलटी 1–दारिद्र्यरेषेखालील | 0.00 | 0.00 | 0.00 | 0.00 |
| एलटी–1 निवासी (सिंगल फेज) | | | | |
| 0–100 | 0.00 | 0.00 | 0.00 | 0.00 |
| 101–300 | 0.00 | 0.00 | 0.00 | 0.00 |
| 301–500 | 0.00 | 3.54 | 2.24 | 1.96 |
| 500 व त्यावरील | 0.03 | 5.23 | 3.97 | 3.69 |
| **एलटी–1 निवासी थ्री फेज** | | | | |
| 0–100 | 0.00 | 0.00 | 0.00 | 0.00 |
| 101–300 | 0.00 | 0.00 | 0.00 | 0.00 |
| 301–500 | 0.00 | 3.53 | 2.23 | 1.95 |
| 500 व त्यावरील | 0.00 | 5.00 | 3.74 | 3.47 |
| एलटी 2(अ) 0–20 किवॅ | 0.00 | 2.51 | 1.97 | 1.97 |
| एलटी 2(ब) – 20–50 किवॅ | 0.00 | 1.81 | 1.29 | 1.30 |
| एलटी 2(क) – 50 किवॅ वरील | 0.84 | 4.44 | 2.74 | 2.45 |

| तपशील | अस्तित्वातील/आव 12-13 | आव 13-14 | आव 14-15 | आव 15-16 |
|---|---|---|---|---|
| एलटी 3-एलटी औद्योगिक 20 किवॅपर्यंत | 1.90 | 5.04 | 3.15 | 2.85 |
| एलटी 4-एलटी औद्योगिक 20 किवॅ वरील | 0.00 | 1.76 | 0.83 | 0.55 |
| एलटी-5 : एलटी-जाहिराती आणि होर्डिंग्ज | 0.00 | 1.80 | 0.90 | 0.61 |
| एलटी 6: एलटी-पथदीप | 8.35 | 13.17 | 12.07 | 12.30 |
| एलटी-7 (अ): एलटी-तात्पुरता पुरवठा धार्मिक | 0.00 | 2.77 | 2.20 | 2.17 |
| एलटी-7 (ब): एलटी-तात्पुरता पुरवठा इतर | 0.00 | 0.54 | 0.00 | 0.00 |
| एलटी 8: एलटी- दहनभूमी आणि दफनभूमी | 5.51 | 11.09 | 9.88 | 9.96 |
| एलटी 9: एलटी-कृषी | 0.00 | 0.00 | 0.00 | 0.00 |
| | 0.00 | 0.00 | 0.00 | 0.00 |
| **एचटी** | | | | |
| एचटी1: एचटी-औद्योगिक | 0.00 | 1.96 | 1.44 | 1.30 |
| एचटी2 : एचटी-वाणिज्यिक | 0.26 | 2.91 | 2.10 | 1.86 |
| एचटी 3: एचटी-गृहसंस्था समूह | 0.00 | 0.39 | 0.32 | 0.52 |
| एचटी 4 : एचटी-तात्पुरता पुरवठा | 2.22 | 6.43 | 5.88 | 5.92 |
| एचटी-रेल्वे (नवीन संवर्ग | 0.00 | 0.00 | 0.00 | 0.00 |

दुसऱ्या नियंत्रण कालावधीसाठी क्रॉस सबसिडीच्या वसुलीमुळे प्राप्त झालेले उत्पन्न, एमवायटी याचिकेत विचारात घेतल्यानुसार, सारांश रूपाने खालील तक्त्यात संदर्भासाठी दिलेले आहे.

**तक्ता 22: चेंजओव्हर ग्राहकांकडून क्रॉस सबसिडी आकाराची वसुली (कोटी रु.)**

| तपशील | आव 12-13 | आव 13-14 | आव 14-15 | आव 15-16 |
|---|---|---|---|---|
| क्रॉस सबसिडी अधिभारातून प्राप्त उत्पन्न | 98.67 | 468.29 | 115.46 | 107.29 |

**1.7. आव 12–13 साठी महसुलातील तफावत**

आव 12–13 साठी आरइन्फ्रा–डी दरपत्रकात कोणताही बदल प्रस्तावित करीत नाही. एप्रिल 2012 ते सप्टेंबर 2012 या कालावधीचा महसूल वास्तविक आकडेवारीनुसार घेतलेला आहे. ऑक्टोबर 2012 ते मार्च 2012 या कालावधीचा महसूल लागू असलेल्या सध्याच्या दरांनुसार आणि ऑक्टोबर 2012 साठी लागू असलेल्या एफएसीच्या आधारे लागू केलेल्या सुधारित एफएसीनुसार अंदाजित केलेला आहे.

**1.8. सध्याच्या दरपत्रकांपासून महसुलातील तफावत/अधिक्य**

सध्याच्या दरपत्रकांपासून महसुलातील तफावत/अधिक्य यांचा सारांश खाली दिलेला आहे:

**तक्ता 23: सध्याच्या दरपत्रकांपासून महसुलातील तफावत/अधिक्य (कोटी रु.)**

| सध्याच्या दरपत्रकांपासून महसुलातील तफावत | आव 12–13 | आव 13–14 | आव 14–15 | आव 15–16 |
|---|---|---|---|---|
| महसुलाची निव्वळ आवश्यकता | 4974.31 | 4831.89 | 5063.82 | 5387.41 |
| आव 13 साठी महसुलातील तफावत | | 340.79 | | |
| एकूण महसुलाची आवश्यकता | 4974.31 | 5172.68 | 5063.82 | 5387.41 |
| सध्याच्या दरपत्रकापासूनचा महसूल | 4633.53 | 5244.68 | 5444.34 | 5675.19 |
| अधिक्य/(तफावत) | –340.78 | 72.00 | 380.52 | 287.78 |

**1.9. दरपत्रकाचा प्रस्ताव**

**1.9.1. दरपत्रकाची तत्त्वे**

दुसऱ्या नियंत्रण कालावधीसाठी दरपत्रक प्रस्ताव तयार करताना खालील तत्त्वांचा अंगीकार केलेला आहे.

- सर्व ग्राहक संवर्गांमध्ये स्थिर आकारांचे वाजवीकरण
- ग्राहक संवर्गांमधील क्रॉस सबसिडी कमी करणे आणि दरपत्रकाचे अशा प्रकारे वाजवीकरण करणे ज्यायोगे संबंधित ग्राहक संवर्गाला सेवा देण्यासाठीचा खर्च दिसून येईल.
- जे ग्राहक इतर ग्राहकांना मोठ्या प्रमाणावर क्रॉस सबसिडायझिंग करतात त्या ग्राहक संवर्गांना सूट देण्यासाठी दरपत्रकांमध्ये मोठ्या प्रमाणावरील बदल
- इतर वितरण परवानाधारकांच्या तुलनेत क्रॉस सबसिडायझिंग संवर्गांसाठी शक्य तेवढी अधिक समानता आणणे, ज्यामुळे क्रास सबसिडीमुळे होणारा तोटा टळेल व कमी बिल भरण्याची क्षमता असलेल्या ग्राहकांवर होणारा परिणाम टाळला जाईल.

- निवासी संवर्गामध्ये सूट दिलेल्या ग्राहकांवर दरपत्रकाचा परिणाम कमीत कमी होईल याची काळजी घेणे.

**1.9.2 प्रस्तावित दरपत्रक**

दुसऱ्या नियंत्रण कालावधीसाठीच्या प्रस्तावित स्थिर आकारांचा सारांश खाली दिलेला आहे

**तक्ता 24: प्रस्तावित स्थिर आणि मागणी आकार**

| | अस्तित्वातील | | प्रस्तावित (आव 13-14 ते आव 15-16) | |
|---|---|---|---|---|
| ग्राहक संवर्ग | स्थिर आकार (रु./ग्राहक/ महिना) | मागणी आकार (रु./केव्हीए/ महिना) | स्थिर आकार (रु./ग्राहक/ महिना) | मागणी आकार (रु./केव्हीए/ महिना) |
| एलटी1-दारिद्र्यरेषेखालील | 3 | | 5 | |
| एलटी-1 निवासी (सिंगल फेज) | | | | |
| 0-100 | 30 | | 40 | |
| 101-300 | 50 | | 75 | |
| 301-500 | 50 | | 75 | |
| 500 व त्यावरील | 100 | | 150 | |
| एलटी-1 निवासी थ्री फेज | 0 | | 0 | |
| 0-100 | 100 | | 150 | |
| 101-300 | 100 | | 150 | |
| 301-500 | 100 | | 150 | |
| 500 व त्यावरील | 100 | | 150 | |
| एलटी 2(अ) - 0-20 किवॅ | 200 | | 205 | |
| एलटी 2(ब) - 20-50 किवॅ | | 150 | | 210 |
| एलटी 2(क) 50 किवॅ वरील | | 150 | | 210 |
| एलटी 3-एलटी औद्योगिक 20 किवॅपर्यंत | 200 | | 205 | |

| | अस्तित्वातील | | प्रस्तावित (आव 13-14 ते आव 15-16) | |
|---|---|---|---|---|
| ग्राहक संवर्ग | स्थिर आकार (रु./ग्राहक/ महिना) | मागणी आकार (रु./केव्हीए/ महिना) | स्थिर आकार (रु./ग्राहक/ महिना) | मागणी आकार (रु./केव्हीए/ महिना) |
| एलटी 4-एलटी औद्योगिक 20 किवॅ वरील | | 150 | | 205 |
| एलटी-5: एलटी-जाहिराती आणि होर्डिंग्ज | 200 | | 205 | |
| एलटी 6: एलटी-पथदीप | | 150 | | 205 |
| एलटी-7 (अ): एलटी-तात्पुरता पुरवठा, धार्मिक | 200 | | 205 | |
| एलटी-7 (ब): एलटी-तात्पुरता पुरवठा, इतर | 200 | | 205 | |
| एलटी 8: एलटी दहनभूमी आणि दफनभूमी | 200 | | 205 | |
| एलटी 9: एलटी- कृषी | | 15 | | 15 |
| **एचटी** | | | | |
| एचटी1: एचटी-औद्योगिक | | 150 | | 210 |
| एचटी 2: एचटी-वाणिज्यिक | | 150 | | 210 |
| एचटी 3: एचटी-गृहसंस्था समूह | | 150 | | 210 |
| एचटी4: एचटी-तात्पुरता पुरवठा | 200 | | 280 | |
| एचटी रेल्वेज् | NA | NA | | 210 |

त्याचप्रमाणे, प्रस्तावित ऊर्जा आकार खाली दिलेले आहेत

**तक्ता 25: दुसऱ्या नियंत्रण कालावधीसाठी प्रस्तावित ऊर्जा आकार (एफएसी सहित) (रु./युनिट)**

| ग्राहक संवर्ग | अस्तित्वातील आव 12-13 | आव 13-14 | आव 14-15 | आव 15-16 |
|---|---|---|---|---|
| एलटी1-दारिद्र्यरेषेखालील | 0.47 | 0.47 | 0.47 | 0.55 |
| एलटी-1 निवासी (सिंगल फेज) | | | | |
| 0-100 | 3.50 | 3.50 | 3.50 | 3.74 |
| 101-300 | 6.57 | 6.57 | 6.57 | 6.83 |
| 301-500 | 10.83 | 10.51 | 9.25 | 9.25 |
| 500 व त्यावरील | 12.54 | 12.23 | 11.01 | 11.01 |
| एलटी-1 निवासी थ्री फेज | | | | |
| 0-100 | 3.50 | 3.50 | 3.50 | 3.74 |
| 101-300 | 6.57 | 6.57 | 6.57 | 6.83 |
| 301-500 | 10.83 | 10.51 | 9.25 | 9.25 |
| 500 व त्यावरील | 12.54 | 12.23 | 11.01 | 11.01 |
| एलटी 2(अ) - 0-20 किवॅ | 9.40 | 9.30 | 8.81 | 9.09 |
| एलटी 2(ब) - 20-50 किवॅ | 12.13 | 10.92 | 9.28 | 9.28 |
| एलटी 2(क) 50 किवॅ वरील | 12.89 | 11.60 | 9.77 | 9.77 |
| एलटी 3-एलटी औद्योगिक 20 किवॅपर्यंत | 9.17 | 8.99 | 8.09 | 8.09 |
| एलटी 4-एलटी औद्योगिक 20 किवॅ वरील | 8.76 | 8.58 | 7.72 | 7.72 |
| एलटी-5: एलटी-जाहिराती आणि होर्डिंग्ज | 20.87 | 19.83 | 18.78 | 19.29 |
| एलटी 6: एलटी-पथदीप | 9.82 | 9.53 | 9.01 | 9.26 |

| ग्राहक संवर्ग | अस्तित्वातील आव 12–13 | आव 13–14 | आव 14–15 | आव 15–16 |
|---|---|---|---|---|
| एलटी–7 (अ): एलटी–तात्पुरता पुरवठा, धार्मिक | 4.50 | 5.49 | 5.00 | 5.25 |
| एलटी–7 (ब): एलटी–तात्पुरता पुरवठा, इतर | 18.69 | 18.49 | 17.31 | 17.67 |
| एलटी 8: एलटी– दहनभूमी आणि दफनभूमी | 4.50 | 4.59 | 4.59 | 4.77 |
| एलटी 9: एलटी– कृषी | 0.95 | 0.97 | 0.97 | 1.01 |
| **एचटी विक्री** | | | | |
| एचटी 1: एचटी–औद्योगिक | 8.93 | 7.59 | 7.00 | 7.06 |
| एचटी 2: एचटी–वाणिज्यिक | 9.94 | 8.45 | 7.61 | 7.61 |
| एचटी 3: एचटी–गृहसंस्था समूह | 6.10 | 6.25 | 6.10 | 6.50 |
| एचटी 4: एचटी–तात्पुरता पुरवठा | 13.00 | 12.75 | 12.11 | 12.35 |
| एचटी रेल्वेज् | 5.00 | 5.00 | 5.00 | 5.25 |

### 1.9.3. प्रस्तावित दरपत्रकापासूचा महसूल

प्रस्तावित दरपत्रकाच्या आधारे, खालील दिलेल्या तक्त्यात दुसऱ्या नियंत्रण कालावधीसाठी अंदाजित महसूल दिलेला आहे.

**तक्ता 26: प्रस्तावित दरपत्रकापासूनची महसुलातील तफावत (कोटी रु.)**

| प्रस्तावित दरपत्रकापासूनची महसुलातील तफावत | आव 12–13 | आव 13–14 | आव 14–15 | आव 15–16 |
|---|---|---|---|---|
| निव्वळ महसुलाची आवश्यकता | 4974.31 | 4831.89 | 5063.82 | 5387.41 |
| आव 13 साठी महसीलातील तफावत | | 340.79 | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| एकूण महसुलाची आवश्यकता | 4974.31 | 5172.68 | 5063.82 | 5387.41 |
| प्रस्तावित दरांपासूनचा महसूल | 4633.53 | 5172.67 | 5063.83 | 5387.41 |
| अधिक्य/ (तफावत) | -340.78 | (0.00) | 0.01 | (0.00) |

खाली दिलेल्या तक्त्यात आव 12-13 ते आव 15-16 या कालावधीतील प्रत्येक वर्षासाठी प्रस्तावित सरासरी बिलिंग दर (एबीआर) आणि पुरवठ्याचा सरासरी खर्चाच्या (एसीओएस) टक्केवारीची तुलना दिलेली आहे.

**तक्ता 27: दुसऱ्या नियंत्रण कालावधीसाठी एबीआरच्या तुलनेत एसीओएस (%टर्मस्)**

| ग्राहक संवर्ग | आव 12-13 (एच 2) | आव 13-14 | आव 14-15 | आव 15-16 |
|---|---|---|---|---|
| एलटी-1 निवासी (सिंगल फेज) | | | | |
| 0-100 | 46.89% | 47.21% | 49.52% | 51.11% |
| 101-300 | 91.42% | 94.18% | 99.22% | 99.98% |
| 301-500 | 143.25% | 140.84% | 131.09% | 127.23% |
| 500 व त्यावरील | 164.80% | 162.36% | 154.22% | 149.66% |
| एलटी-1 निवासी थ्री फेज | | | | |
| 0-100 | 47.90% | 49.00% | 51.31% | 52.76% |
| 101-300 | 88.00% | 89.49% | 93.95% | 94.50% |
| 301-500 | 142.96% | 140.67% | 130.94% | 127.10% |
| 500 व त्यावरील | 162.46% | 159.35% | 151.18% | 146.81% |
| एलटी 2(अ) - 0-20 किवॅ | 129.33% | 127.61% | 127.44% | 127.27% |
| एलटी 2(ब) - 20-50 किवॅ | 164.61% | 152.21% | 137.78% | 133.55% |
| एलटी 2(क) 50 किवॅ वरील | 173.65% | 159.91% | 143.23% | 138.76% |
| एलटी 3-एलटी औद्योगिक 20 किवॅपर्यंत | 120.53% | 118.07% | 112.06% | 108.82% |

| ग्राहक संवर्ग | आव 12–13 (एच 2) | आव 13–14 | आव 14–15 | आव 15–16 |
|---|---|---|---|---|
| एलटी 4–एलटी औद्योगिक 20 किवॅ वरील | 118.91% | 118.62% | 113.01% | 109.60% |
| एलटी–5: एलटी–जाहिराती आणि होर्डिंग्ज | 276.83% | 263.47% | 262.85% | 261.87% |
| एलटी 6: एलटी–पथदीप | 131.88% | 130.90% | 130.52% | 129.89% |
| एलटी–7 (अ): एलटी–तात्पुरता पुरवठा, धार्मिक | 131.97% | 102.51% | 100.60% | 100.38% |
| एलटी–7 (ब): एलटी–तात्पुरता पुरवठा, इतर | 239.72% | 236.95% | 233.42% | 231.49% |
| एलटी 8: एलटी दहनभूमी आणि दफनभूमी | 58.10% | 59.19% | 62.28% | 62.84% |
| एलटी 9: एलटी– कृषी | 12.12% | 12.36% | 13.01% | 13.16% |
| | | | | |
| एचटी 1: एचटी–औद्योगिक | 120.65% | 105.60% | 102.95% | 100.78% |
| एचटी 2: एचटी–वाणिज्यिक | 134.81% | 117.78% | 111.81% | 108.10% |
| एचटी 3: एचटी–गृहसंस्था समूह | 82.41% | 85.63% | 87.94% | 90.55% |
| एचटी 4: एचटी–तात्पुरता पुरवठा | 165.91% | 162.60% | 162.46% | 161.00% |
| एचटी रेल्वेज् | 0.00% | 71.63% | 75.35% | 75.95% |

**टीओडी दरपत्रक:** सर्वोच्च मागणीच्या कालावधीऐवजी मागणी कमी असलेल्या कालावधीत विजेचा वापर करण्यास प्रोत्साहन देण्यासाठी आरइन्फ्रा–डी सर्वोच्च मागणीचा कालावधी वगळून वापर केलेल्या विजेसाठी देण्यात येणारी सूट वाढविण्याचा विचार करीत आहे (2200 तास ते 0600 तास). यामुळे करार केलेली क्षमता आणि अल्पकालीन प्राप्त केलेली वीज यांचा योग्य वापर करण्यास मदत होईल. त्यानंतर, ग्राहकांनाही हे फायदेशीर ठरेल. आरइन्फ्रा–डी मागणी कमी असलेल्या कालावधीमध्ये (2200 तास ते 0600 तास) सर्व ग्राहक संवर्गांसाठी लागू असलेली टीओडी सूट रु. 2.50 प्रति किवॅतास एवढी वाढविण्याचा प्रस्ताव ठेवीत आहे. आरइन्फ्रा–डीने प्रस्तावित केलेले टीओडी दरपत्रक खाली दिलेले आहे.

**तक्ता 28: टीओडी (रु./किवॅतास)**

| टीओडी स्लॉट | अस्तित्वातील | प्रस्तावित |
|---|---|---|
| 0600 – 0900 तास | 0.00 | 0.00 |
| 0900 – 1200 तास | 0.50 | 0.50 |
| 1200 – 1800 तास | 0.00 | 0.00 |
| 1800 – 2200 तास | 1.00 | 1.00 |
| 2200 – 0600 तास | −0.75 | −2.50 |